# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 2812 दिनांक : ०९.१०.२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत प्रस्तुत विभागाच्या अधिपत्याखालील प्राचार्यांची सहविचार सभा.**

**१. शिष्यवृत्ती योजनांचा आढावा.**
**२. महाविद्यालयातील वित्तीय व प्रशासकीय अडचणी व त्याचे निराकरण.**
**३. शासनाची ध्येय धोरणे.**
**४. राज्याच्या उच्च शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील ५ वर्षांच्या कालावधीत घ्यावयाचे दीर्घकालीन उपक्रम/ योजना/ कार्यक्रम.**

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत योजनांची एन.एस.पी. पोर्टलवरुन (https://scholarships.gov.in) तसेच राज्यशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टल वरुन (https://mahadbtmahait.gov.in) विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या अर्जाबाबत आढावा घेण्यात येईल.

तसेच महाविद्यालयांतील वित्तीय व प्रशासकीय अडचणींचे निराकरण करण्याबाबत, शासनाची ध्येय धोरणे, राज्याच्या उच्च शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील ५ वर्षांच्या कालावधीत हाती घ्यावयाचे दीर्घकालीन उपक्रम/ योजना / कार्यक्रम इ.बाबींवर सर्वंकष चर्चा करणेसाठी व कार्यपध्दतींचा आढावा घेणेबाबत प्राचार्यांची सहविचारसभा मा. सहसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. तरी सर्व वरिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी स्वतः उपस्थित रहावे. प्रतिनिधी पाठविण्यात येवू नये. सदर सभा खालीलप्रमाणे जिल्हानिहाय नमूद केल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | जिल्हा | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | दि. १२.१०.२०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० | नाशिक जिल्ह्यातील व केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली येथील महाविद्यालयांचे प्राचार्य | एच.पी.टी. कॉलेज, नाशिक |
| २. | दि. १४.१०.२०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० | पुणे ग्रामीण व पुणे शहर यांतील महाविद्यालयांचे प्राचार्य | तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती, जि. पुणे |
| ३. | दि. १५.१०.२०१९ | सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० | अहमदनगर जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर |

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे